02-04-2025-Dai-03aa_DH_PAN_20_08_2016-3.qxp 01-04-2025 22:26 Page 1



## निवडक

### महामाया कालिका देवस्थानात ४ रोजी वसंत पंचमी व नवचंडी

टीम दैनिक हेराल्ड



साखळी, दि. १ : श्री महामाया कालिका देवस्थान,वन डिचोली येथे शुक्रवार दि. ४ रोजी वसंत पंचमी व नवचंडी उत्सव आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्त सकाळी ९ वाजता देवकृत्य, दुपारी १ वाजता नवचंडी पूर्णाहुती,नंतर आरती व तीर्थप्रसाद, दुपारी २ वाजता महाप्रसाद, संध्याकाळी ५ वाजता पालखी प्रदक्षिणा तद्नंतर आरती व तीर्थप्रसाद, ७.३० वाजता स्थानिक कलाकारांचा भजनाचा कार्यक्रम होणार असून वसंतपंचमीचे यजमान श्री. व सौ. अस्मिता रोहित धामस्कर तर नवचंडीचे यजमान श्री. व सौ. पौर्णिमा रघुवीर धामस्कर कुटूंबिय, कुड्डाळी हे आहेत. भाविकांनी या कार्यक्रमास उपस्थिती लावावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

---

### मांद्रे शिग्मोत्सव वेशभूषा स्पर्धेस परिधी वायंगणकरचे यश

टीम दैनिक हेराल्ड



**हरमल, दि. १** : मांद्रे येथील उदरगत संस्था व पर्यटन खाते आयोजित शिमगोत्सवानिमित मर्यादित वेशभूषा स्पर्धेत कुमारी परिधी वायंगणकर हिने पाचवे बक्षीस पटकावले. या स्पर्धेस मांद्रे मतदारसंघातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यंदाच्या शिगमोत्सवात मांद्रे मतदारसंघातील बाल कल्करांसाठी उदरगत संस्थेने वेशभूषा स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत कुमारी परिधी हिने जिजाऊ भूमिका साकारली होती. परिधी हिने शालेय स्तरावर तिने अनेक बक्षिसे पटकावली आहे. हरमलचें माजी सरपंच सौ प्रणाली व माजी पंच प्रविण वायंगणकर यांच्या त्या कन्या होय.तिच्या यशाबद्दल मांद्रे मतदारसंघाचे आमदार जीत आरोलकर यांनी खास अभिनंदन केले आहे.

---

### मडगावात उद्या खंडित वीजपुरवठा

टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १** : मडगाव शहरातील विक्रांत इमारतजवळील फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने गुरुवार दि. ३ रोजी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत गडेकर हाऊस, क्लासिक इस्पितळासमोर आणि मागील भागात, माऊली हॉटेलसमोर आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

### आगोंद, खोतीगाव भागात उद्या खंडित वीजपुरवठा

टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद. दि. १** : आगोंद फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने गुरुवार दि. ३ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत संपूर्ण खोला आणि आगोंद ग्रामपंचायत भागात आणि देवबाग अपडेच्या कांही भागात वीज पूरवठा केला जाणार नाही. त्याचप्रमाणे ११ केव्ही खोतीगांव फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने गुरुवार दि. ३ रोजी दुपारी २ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत संपूर्ण खोतीगांव ग्रामपंचायत भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

### देवराई इमारत फिडरवर दुरुस्तीमुळे आज खंडित वीजपुरवठा

टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १ : देवराई इमारत फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने २ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ९.०० ते संध्या ६.०० वाजेपर्यंत सहयोग सहकारी सोसायटी, पांडवा चॅपलच्या मागे, पांडवा चॅपल हॉटेलजवळील सनराइज लॉन्ड्री वॉशिंग सेंटरसमोर, उडपी मनीष इमारतीजवळ, शुभ लक्ष्मी इमारतीजवळ आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

### वाळपे शिरोडा भागात वीज तारांबाबत इशारा

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १** : वाळपे शिरोडा येथे नव्याने उभारण्यात आलेले १००० केव्हीए वितरण ट्रान्सफॉर्मर केंद्र व त्याच्या संघटित वीज वाहिन्या १ रोजी पासून विद्युतभारीत करण्यात आली असून यापुढेही ती तशीच भारीत राहील. लोकांनी या वरील यंत्रसामुग्रीपासून दूर रहावे त्यांना स्पर्श करू नये अन्यथा जिवीतास धोका आहे.

---

### नेसाय येथे वीज तारांबाबत इशारा

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १** : नेसाय येथील मेसर्स रेहाना आइस प्लांट, ए-२७ येथे नव्याने उभारण्यात आलेले २०० केव्हीए ट्रान्सफॉर्मर व त्याच्या संघटित एचटी एलटी वीज वाहिन्या विद्युतभारीत करण्यात आल्या असून यापुढेही त्या तशाच भारीत राहतील. त्याचप्रमाणे नागमोडे नावेली येथे नव्याने उभारण्यात आलेले २०० केव्हीए ट्रान्सफॉर्मर व त्याच्या संघटित एचटी एलटी वीज वाहिन्या विध्युतभारीत करण्यात आल्या असून यापुढेही त्या तशाच भारीत राहतील. लोकांनी या वरील यंत्रसामुग्रीपासून दूर रहावे त्यांना स्पर्श करू नये अन्यथा जिवीतास धोका आहे.

# बाणावलीचा कृषी वारसा पुनरुज्जीवित करण्यासाठी कोमुनिदादचा पुढाकार

टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १** : एकेकाळी विस्तीर्ण भातशेतीसाठी प्रसिद्ध असलेल्या बाणावली गावाचा कृषी वारसा हळूहळू लोप पावत आहे. पर्यटन व्यवसाय आणि मासेमारी यांना प्राधान्य मिळाल्याने शेतीकडे दुर्लक्ष झाले. मात्र, आता गावातील पारंपरिक प्रशासकीय संस्था या क्षेत्राचा पुनरुज्जीवनाचा निर्धार करत आहे.

अलीकडेच निवडून आलेल्या बाणावली कोमुनिदाद समितीने निष्क्रिय पडलेल्या जमिनींना पुन्हा उत्पादनक्षम करण्यासाठी महत्त्वाकांक्षी योजना आखली आहे. अध्यक्ष ऑरलँडो मेस्किटा, वकील अमानसियो फर्नांडिस, कोषाध्यक्ष केटानो फर्नांडिस आणि एस्क्रिवाओ निलेश डीसा यांच्या नेतृत्वाखाली समितीने १ लाख चौरस मीटर क्षेत्र शेतीसाठी पुनरुज्जीवित करण्याचे लक्ष्य ठरवले आहे.

डॉन बॉस्को कृषी युनिटचे फादर जॉर्ज क्वाड्रोस, जे गोव्याचे धान्य पुरुष म्हणून ओळखले जातात, यांनी या पारंपरिक पद्धतीच्या शेत लागवडीच्या उपक्रमाला पाठिंबा दिला आहे. त्यांनी ज्योती तपकिरी तांदळाच्या उत्पादनासाठी यांत्रिक पुनर्लावणी आणि रोपवाटिका विकासात मदत करण्याचे आश्वासन दिले आहे.

या प्रकल्पासाठी कृषी क्षेत्रातील तज्ज्ञ आणि स्थानिक प्रशासनाची मदत घेतली जात आहे. नुवेमधील जोस डी'कोस्टा यांच्या कृषी युनिटचा उपयोग आवश्यक संसाधनांसाठी केला जाणार आहे. तसेच, गोवा पीआरआय युनियनच्या प्रतिनिधी जे. सँटानो रॉड्रिग्ज यांनी शाश्वत शेती पद्धतीबाबत मार्गदर्शन केले आहे.

झोनल ॲग्रीकल्चर ऑफिसर राजेश कोस्टा यांनी या उपक्रमाला सहकार्य करण्याची तयारी दर्शवली आहे. पावसाळ्यानंतर तांदूळ, भाजीपाला, चवळी आणि अळसाणे यासारखी विविध पिके घेतली जाणार आहेत. याशिवाय, कोमुनिदाद तलाव आणि जलसाठ्यांचे पुनर्संचयित करणे हा देखील प्रकल्पाचा महत्त्वाचा भाग आहे. वृक्षारोपण मोहिमेद्वारे जांभूळ, कोकम, चिंच यांसारखी स्थानिक झाडे लावली जातील. या उपक्रमात वन विभाग आणि स्थानिक शालेय विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

जलसंपदा विभागाच्या सहकार्याने नैसर्गिक नाल्यांची स्वच्छता आणि जलनिकासी व्यवस्थापन सुधारण्यात येणार आहे. यासोबतच, गावाच्या सांस्कृतिक वारशाचा एक भाग असलेल्या पोर्तुगीज-पूर्व कोमुनिदाद हॉलच्या दुरुस्तीसाठी देखील समितीने पुढाकार घेतला आहे.

मे महिन्यात कोमुनिदाद सदस्यांचे नोंदणी पत्रे नूतनीकरण करण्यासाठी विशेष मोहीम राबवण्यात येणार आहे. त्याचबरोबर, गावातील शेतीयोग्य जमिनींची नोंदणी करून त्या पुनरुज्जीवित करण्यावर भर दिला जाणार आहे.

आमच्या पारंपरिक शेती पद्धती जिवंत ठेवण्याची गरज आहे. बाहेरून आयात केलेल्या अन्नपदार्थांमध्ये रसायनांचे प्रमाण अधिक असल्याने स्थानिक स्तरावर निर्मित अन्नसुरक्षेला चालना देणे हे महत्त्वाचे आहे असे फर्नांडिस यांनी स्पष्ट केले.

या योजनांद्वारे बाणावली कोमुनिदाद कृषी पुनरुज्जीवनाबरोबरच पर्यटन आणि मासेमारी यांच्यात संतुलन साधण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे बाणावलीचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा जपण्यास मदत होणार आहे.

# राज्यातील धरणांतील पाण्याची पातळी घटली

टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. १** : राज्यातील चार प्रमुख धरणांमध्ये पाण्याची पातळी ५० टक्क्यांपेक्षा कमी झाली असली तरी, राज्यभर अखंडित पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे जलसंपदा मंत्री सुभाष शिरोडकर यांनी स्पष्ट केले आहे. त्यांनी मे अखेरपर्यंत कोणत्याही भागात पाणीटंचाई जाणवू नये यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आल्याचे सांगितले.

दक्षिण गोव्याला पाणीपुरवठा करणाऱ्या प्रमुख साळवली धरणात सध्या ६२ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. काणकोणातील चाफोली धरण आणि लहान गवाणे जलाशया अनुक्रमे ६४ आणि ६८ टक्के पाणी शिल्लक आहे. मात्र, उत्तर गोव्याला पाणीपुरवठा करणाऱ्या तिलारी धरणातील पाण्याची पातळी ४१ टक्क्यांवर घसरली आहे.

तसेच, अंजुने जलाशयात ४८ टक्के पाणीसाठा असून सत्तरी आणि डिचोली च्या काही भागांना या धरणातून पाणीपुरवठा होतो. आमठणे धरण, जे बार्देश, पेडणे आणि डिचोली च्या काही भागांना पाणीपुरवठा करते, त्यातील पाण्याची पातळी २७ टक्क्यांवर घटली असून ही सर्वात कमी नोंदलेली पातळी आहे. पंचवाडी धरणात ४८ टक्के पाणीसाठा नोंदवण्यात आला आहे.

उन्हाळ्यात पाण्याची मागणी वाढण्याची शक्यता असूनही जलसंपदा मंत्री शिरोडकर यांनी राज्यातील नागरिकांना आश्वस्त केले आहे. धरणांमध्ये मे अखेरपर्यंत पुरेसा साठा आहे. पाण्याचे व्यवस्थापन आणि वितरण योग्य पद्धतीने करण्यात येत आहे, असे त्यांनी विधानसभेच्या नुकत्याच पार पडलेल्या अधिवेशनात सांगितले.

राज्यात पाण्याची टंचाई टाळण्यासाठी सरकार सतत प्रयत्नशील असून, नद्यांच्या काठावर साठवलेल्या पाण्याचा आवश्यकतेनुसार उपयोग केला जाणार आहे. तसेच, उन्हाळी पावसाची शक्यता लक्षात घेता, धरणांची पातळी सुधारण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या अंदाजानुसार, गोव्यात काही भागांमध्ये अधूनमधून पावसाची शक्यता आहे, त्यामुळे धरणांतील जलसाठ्यात वाढ होऊ शकते. राज्यातील पाणीपुरवठा सुरळीत राहण्यासाठी सरकार आवश्यक सर्व उपाययोजना करीत असून, नागरिकांना कोणत्याही प्रकारच्या पाणीटंचाईचा सामना करावा लागणार नाही, असा विश्वास जलसंपदा मंत्री शिरोडकर यांनी व्यक्त केला आहे.

# कोमुनिदाद जमिनीवरील रस्ता बांधकामाला रहिवाशांचा आक्षेप

टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १** : केळशी येथील रहिवाशांनी कोमुनिदाद जमिनीवर प्रस्तावित रस्ता बांधकामाबाबत तीव्र चिंता व्यक्त केली आहे. हा रस्ता सार्वजनिक आहे की खाजगी, तसेच या प्रकल्पात सार्वजनिक बांधकाम विभागाचा सहभाग आहे का, याबाबत त्यांनी शंका उपस्थित केली आहे.रहिवाशांनी केळशी ग्रामपंचायतीकडून या प्रकल्पासाठी देण्यात आलेल्या ना हरकत प्रमाणपत्राच्या आधारे स्पष्टता मागितली आहे. सरपंच डिक्सन वाझ यांनी सांगितले की, रस्ता बांधणाऱ्या संबंधित पक्षाने आवश्यक परवानग्या सादर केल्या असून, काम पूर्ण झाल्यानंतर या रस्त्याचा सार्वजनिक वापर सुनिश्चित केला जाईल.

माध्यमांशी संवाद साधताना, नातिविदाद फर्नांडिस आणि क्लाइड फर्नांडिस यांच्यासह स्थानिक रहिवाशांनी या रस्त्याच्या निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणावर झाडे व वनस्पती हटवण्यात आल्याचे निदर्शनास आणून दिले. तसेच, वाळूचा ढिगारा विस्कळीत झाल्याने स्थानिक जलस्रोतांवर विपरीत परिणाम झाल्याचा आरोप त्यांनी केला.

नातिविदाद फर्नांडिस यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, जर हा रस्ता सार्वजनिक म्हणून नोंदवलेला नसेल, तर त्याच्या बांधकामाला परवानगी कशी देण्यात आली. त्यांनी अधिकृत चौकशीची मागणी करत सांगितले की, हा विषय संबंधित विभागांकडे आणि दक्षिण गोव्याच्या खासदारांकडे सविस्तर चौकशीसाठी पाठवला जाईल.

दरम्यान, क्लाइड फर्नांडिस यांनी हा रस्ता सार्वजनिक असल्यास पीडब्ल्यूडीचा यात सहभाग का नाही, याबाबत प्रश्न उपस्थित केला. त्यांनी नमूद केले की, हा रस्ता एका खाजगी कंपनीच्या मालमत्तेजवळ संपतो, ज्यामुळे रहिवाशांमध्ये शंका निर्माण झाली आहे. यामुळे अनेक प्रश्न निर्माण होत असून, आम्ही संबंधित अधिकाऱ्यांकडून स्पष्टता मागणार आहोत, असे ते म्हणाले. या संदर्भात सरपंच वाझ यांनी पुनरुच्चार केला की, हा प्रकल्प खाजगी निधीतून राबवला जात असला तरी पंचायत याचा सार्वजनिक वापर सुनिश्चित करेल. तसेच, संबंधित अधिकाऱ्यांकडून आवश्यक मंजुरी घेण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



पणजी : नव्या मांडवी पुलाच्या देखभाल दुरुस्तीचे काम वेगाने सुरू आहे. (उपेंद्र नाईक)

# मांद्रे स्वरगंधातर्फे उन्हाळी कला शिबिर

टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १** : दांडोसवाडा – मांद्रे येथील स्वरगंधा प्राथमिक विद्यालयात ७ ते १२ एप्रिल दरम्यान उन्हाळी कला शिबिर होणार आहे. दररोज सकाळी ८ ते १०.३० या वेळेत हे शिबिर होईल. शिबिरात गावातील पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यालयांमध्ये शिकणाऱ्या मुलांना तज्ज्ञ प्रशिक्षकांकडून सुंदर हस्ताक्षर, योग, चित्रकला, हस्तकला, गायन, नृत्य आणि खेळ वगैरे कलांचे मार्गदर्शन लाभले.

# मध्यान्ह भोजनासाठी स्वयंपाकाच्या तेलाचा वापर कमी होणार

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १** : केंद्र सरकारच्या निर्देशांनुसार, गोवा शिक्षण संचालनालयाने राज्यातील सर्व स्वयं-साहाय्य गटांना मध्यान्ह भोजनासाठी स्वयंपाकाच्या तेलाचा वापर १० टक्क्यांनी कमी करण्याचे निर्देश देण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे हा निर्णय घेण्यात आला असून, प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यदायी आहाराच्या सवयी वाढवण्यावर भर दिला जात आहे. बालपणीच्या स्थूलतेच्या वाढत्या समस्येच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आल्याचे सूत्रांनी स्पष्ट केले.

सध्या विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन योजनेतून मिश्रित भाजीपाला इडली, मिश्रित भाजीपाला पुलाव, छोले-चपाती, व्हेज कोरमा आणि बटाटा भाजी यांसारखे पदार्थ दिले जातात. या भोजनातील तेलाच्या प्रमाणात कपात करण्याचे आदेश देण्यात आले असून, शाळा प्रशासन, विद्यार्थी, पालक आणि अन्य संबंधित घटकांमध्ये याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी विशेष मार्गदर्शन केले जाणार आहे.

सर्व स्वयं-साहाय्य गटांना आणि पालक-शिक्षक संघटनांना स्वयंपाकाच्या तेलाचा वापर १० टक्क्यांनी कमी करण्याचे निर्देश देण्यात येणार आहेत, असे सूत्रांनी सांगितले. तसेच, विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनाव्यतिरिक्त ताज्या आणि हंगामी फळांचे सेवन करण्याचा सल्ला पालकांना दिला जाणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १० फेब्रुवारी रोजी 'परीक्षा पे चर्चा २०२५' आणि २३ फेब्रुवारी रोजी 'मन की बात' कार्यक्रमात बालपणीच्या लठ्ठपणाच्या समस्येवर प्रकाश टाकला होता. त्यानंतर काही आठवड्यांतच हा सल्ला जारी करण्यात आला. १५ मार्च रोजी शिक्षण मंत्रालयाने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये, सचिव संजय कुमार यांनी बालपणीच्या लठ्ठपणासंबंधी चिंता व्यक्त करत, तेलाच्या अतिसेवनाचे दुष्परिणाम आणि त्याचा आरोग्यावर होणारा विपरीत परिणाम विद्यार्थ्यांना समजावून सांगणे अत्यावश्यक आहे. पीएम पोषण योजना विद्यार्थ्यांना कमी तेलात ताजे आणि पौष्टिक जेवण सेवन करण्यास प्रवृत्त करण्यासाठी एक उत्तम संधी उपलब्ध करून देते, असे नमूद केले.

पीएम पोषण (पूर्वी मध्यान्ह भोजन योजना म्हणून ओळखली जाणारी) ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. या योजनेंतर्गत केंद्र आणि राज्य सरकार शालेय भोजनाच्या खर्चाचा भार ६०:४० च्या प्रमाणात उचलतात. या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना सकस आहार मिळावा, तसेच त्यांचे आरोग्यदायी जीवनशैलीकडे वळण होण्यासाठी शासन विविध पावले उचलत आहे.

# पर्यटकाने शेअर केलेल्या रोड रेज घटनेची पोस्ट व्हायरल

टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १** : मडगाव रेल्वे स्थानकाजवळ घडलेल्या एका रोड रेज घटनेच्या पार्श्वभूमीवर पर्यटकाने सोशल मीडियावर केलेली पोस्ट सध्या मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे. या घटनेमुळे गोव्यातील पर्यटकांच्या सुरक्षिततेबाबत नव्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दाबोळी विमानतळावर आपल्या मैत्रिणीला सोडल्यानंतर रेल्वे स्थानकाकडे निघालेल्या पर्यटकाने स्थानिक तरुणांकडून झालेल्या हल्ल्याचा आरोप केला आहे.

व्हायरल पोस्टनुसार, गोव्यात शारीरिक शोषण झाले. कदाचित कधीही परत येणार नाही, असे विधान करीत संबंधित पर्यटकाने आपला अनुभव मांडला. या पर्यटकाने गोव्यातील उन्हाच्या तीव्रतेमुळे खासगी कार भाड्याने घेतली होती. मात्र, मडगाव रेल्वे स्थानकाकडे जात असताना दोघांनी एका मोटरसायकलने त्याचा पाठलाग केला आणि कार थांबवून त्याच्यावर हल्ला केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

पर्यटकाच्या दाव्यानुसार, त्याच्या गाडीचा कोणत्याही वाहनाशी संपर्क झाला नव्हता. ना कोणताही धक्का, ना ओरखडा, ना स्पर्श. तरीही त्यांनी मला अडवून मारहाण केली, असे त्याने नमूद केले. तसेच, या तरुणांनी त्याच्या गाडीच्या खिडकीवर दगड मारण्याची धमकी दिली. त्यानंतर, खिडकी उघडताच त्याला थेट मारहाण करण्यात आली आणि अपमानास्पद भाषेचा वापर करण्यात आल्याचे पर्यटकाने सांगितले.

घटनेच्या वेळी पर्यटकाला त्याची ट्रेन गाठण्यासाठी काही मिनिटेच शिल्लक होती, त्यामुळे परिस्थिती अधिक तणावपूर्ण होती. अखेर, काही स्थानिकांनी हस्तक्षेप करत वाद निवळवला आणि पर्यटकाला त्याचे वाहन परत करून ट्रेन पकडण्यास मदत केली. ही घटना इतकी भयंकर होती की मी अजूनही सावरू शकलो नाही. यामुळे गोव्यातील माझ्या पूर्वीच्या आनंददायक आठवणी पुसल्या गेल्या, अशी भावना त्याने व्यक्त केली.

या घटनेनंतर सोशल मीडियावर संमिश्र प्रतिक्रिया उमटल्या असून, काहींनी स्वतःचे नकारात्मक अनुभव शेअर केले आहेत. एका वापरकर्त्याने लिहिले, अगदी तशीच भावना. माझ्या बाबतीत प्रतिक्रिया सौम्य होती, पण मी पुन्हा गोव्यात जाणार नाही. तर दुसऱ्याने म्हटले, गोव्यातील परिस्थिती बिघडली आहे. ही माझी नववी आणि शेवटची भेट असेल.

या घटनेबाबत पर्यटकाने पोलिसांत तक्रार दाखल करण्याचा विचार व्यक्त केला आहे, मात्र त्याच्याकडे हल्लेखोरांचे किंवा त्यांच्या वाहनाचे कोणतेही दृष्य पुरावे उपलब्ध नसल्याचे सांगितले. स्थानिक अधिकाऱ्यांकडे यासंबंधी कोणतीही औपचारिक तक्रार दाखल करण्यात आली आहे का, याची अद्याप पुष्टी झालेली नाही.

या घटनेच्या अनुषंगाने गोव्यातील पर्यटक सुरक्षा आणि वाहतूक व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, प्रशासनाने यावर तत्काळ कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.

# 'वॉन्टेड' आरोपी वर्षभरानंतर सापडला

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १ :** गोवा पोलिसांच्या ताब्यातून पळून गेलेल्या आणि तब्बल वर्षभर फरार असलेल्या देहरादून येथील कुख्यात खंडणीखोराला अखेर दिल्ली पोलिसांनी अटक केली आहे. म्हापसा पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या खंडणीप्रकरणी त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. उत्तर प्रदेशातील सहारनपूरचा रहिवासी इमाद खान (वय ३३) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याने आपल्या साथीदारांसह तक्रारदारास सोशल मीडियावर व्हिडिओ लीक करण्याची धमकी देऊन ३० लाख रुपये उकळल्याचा आरोप आहे.

गोवा पोलिसांच्या माहितीनुसार, खानला म्हापसा पोलिस ठाण्यात भादंवी कलम ३४२, १७०, २३२, ५०६, ३८९ आणि ३४ अंतर्गत अटक करण्यात आली होती. मात्र, मुंबई विमानतळावर ट्रान्झिट दरम्यान, जून २०२३ मध्ये झालेल्या एका किरकोळ भांडणाचा फायदा घेत तो गोवा पोलिसांच्या ताब्यातून फरार झाला होता.

सदर आरोपी आणि त्याच्या टोळीने गुन्हेगारी कारवायांसाठी गोव्यात एक व्हिला भाड्याने घेतला होता. त्यांनी पीडितेचा अश्लील व्हिडिओ प्रसारित करण्याची धमकी देत पैशांची मागणी केली होती. दिल्ली पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे, खानचा शोध घेतला गेला आणि २८ मार्च रोजी देहरादून येथे त्याला अटक करण्यात आली.

चौकशीत, आरोपीने कबूल केले की एका महिलेद्वारे त्याची ओळख गुन्हेगारी टोळीशी करून देण्यात आली होती. पोलिसांच्या अहवालानुसार, खान आणि त्याच्या महिला साथीदाराने दिल्ली नार्कोटिक्स सेलचे अधिकारी असल्याचा बनाव करत म्हापसा येथील एका हॉटेलमध्ये पीडितेशी संपर्क साधला.

खानने स्वतःला 'दिल्ली नार्कोटिक्स आयटी विभागाचे प्रभारी निरीक्षक' म्हणून सादर करत, पीडितेचा मोबाईल, कागदपत्रे, लॅपटॉप पासवर्ड आणि डिजिटल मीडिया ॲक्सेस ताब्यात घेतले. त्यानंतर, पीडितेकडून २० लाख रुपये उकळले आणि एफआयआर दाखल न करण्याच्या मोबदल्यात आणखी २० लाखांची मागणी केली. नंतर ब्लॅकमेल करत आणखी १० लाख रुपये आरटीजीएसद्वारे हस्तांतरित करण्यास भाग पाडले.

शेवटी, सातत्याने होणाऱ्या धमक्यांमुळे पीडितेने २६ फेब्रुवारी २०२४ रोजी कायदेशीर तक्रार दाखल केली. या तक्रारीनंतर म्हापसा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आणि आरोपीचा शोध सुरू करण्यात आला. अखेर दिल्ली पोलिसांनी त्याला देहरादूनमध्ये अटक करून गोवा पोलिसांच्या ताब्यात दिले.